सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या नवीन/अधिकच्या तुकड्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी-२०२६/प्र.क्र.१०२/(ई-१८६२०६६)/कौशल्य-२,

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,

मुंबई- ४०० ०३२.

दिनांक: ०४ नोव्हेंबर, २०२६

<u>वाचा</u>: १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक:व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५(क)/ व्यशि-४, दि. १६ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्रात दि. २० जानेवारी, २०२२ रोजी प्रसिध्द झालेला महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ अधिनियम, २०२१.

३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, अधिसूचना, क्र.व्हिओसी-२०२०/ प्र.क्र.१११/कौशल्य-२, दि.२५ जानेवारी, २०२२

४) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, जा. क्र. मराकौविमं/का-१/मान्यता विभाग/२०२१-२२/१५१, दि. ३१ जानेवारी, २०२२

५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय, क्र. व्हीओसी-२०२०/प्र.क्र. १११/कौशल्य-२, दि. १६ फेब्रुवारी, २०२२

६) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, जा. क्र. बैठक/का. क्र.-१२/२०२३/३०३, दि. ३१ मार्च, २०२२

७) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, जा. क्र. मराकौव्यशिवप्रशिमं/का-१/मान्यता/२०२५/२६२७, दि. २८ नोव्हेंबर, २०२५

८) शासनाचे पत्र क्र. व्हीओसी-२०२५/प्र.क्र. १००/उद्योजकता, दि. ३० जानेवारी, २०२६

९) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, क्र.का.क्र.०१/मान्यता/२०२६/१७०७, दि. ११ ऑगस्ट, २०२६

१०) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, क्र.का.क्र.०१/मान्यता/प्रस्ताव ०२/२०२६/१७३०, दि. १३ ऑगस्ट, २०२६

११) संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे पत्र, क्र.का.क्र.०३/मान्यता/२०२६/१७७८, दि. ०७ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना:

औद्योगिककरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल या बाबींचा विचार करता अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच विशिष्ट शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (ॲड ऑन कोर्सेस) कमी कालावधीचे व्यवसायिक अभ्यासक्रम तयार करून अशा विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगारास चालना मिळण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या व्यवसाय शिक्षणाची गरज भागविण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली सन १९८६ मध्ये महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण मंडळाची (सध्याचे नाव महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ) स्थापना झाली. या मंडळामार्फत रोजगार व स्वयंरोजगार या उद्दिष्टपूर्तीसाठी व्यवसायभिमुख अभ्यासक्रम राबविण्यात येतात. औद्योगिककरणातील वाढ, बदलते तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक बदल इत्यादींमुळे मंडळाच्या अभ्यासक्रमांत कालानुरुप सुधारणा तसेच वाढ करुन सद्य:स्थितीत उक्त मंडळामार्फत विविध गटातील ६ महिने, १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अंशकालीन व पूर्णवेळ स्वरुपाचे असे अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. सदर अभ्यासक्रम चालविण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून इच्छुक खाजगी संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी इच्छुक असलेल्या खाजगी संस्थांकडून प्राप्त अर्जाची संबंधित जिल्हयाच्या जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेमार्फत तपासणी व निरीक्षण करून मंडळाकडे पात्र संस्थेची शिफारस केली आहे. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत करून पात्र संस्थांची यादी शासन मान्यतेसाठी संदर्भाधीन क्र. (९), (१०) व (११) येथील पत्रान्वये सादर करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या ३८ संस्थाच्या ७४ तुकडयांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम प्रथमच नवीन संस्थेत नव्याने सुरु करण्यासाठी/जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /जुन्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ करणे करीता सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम राबविण्यास इच्छुक असलेल्या खाजगी शैक्षणिक संस्थांकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांची छाननी महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत करून, त्यानुसार आवश्यक मानकांची पूर्तता करणाऱ्या संस्थेस महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे विविध गटातील अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्याबाबतची शिफारस मंडळामार्फत करण्यात आली आहे. त्या

संस्थांचा तपशिल सोबतच्या **प्रपत्र "अ"** मध्ये सोबत जोडण्यात आला असून, सदर संस्थांना सन २०२६-२७ पासून महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम प्रथमच नवीन संस्थेत नव्याने सुरु करण्यासाठी/जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /जुन्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ करणे याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

अटी व शर्ती:

१) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम राबविणास मान्यता देण्यात आलेल्या संस्थांना शासन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ तसेच, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबधित कार्यालये यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम चालविणेसाठी संस्थांना, ज्या जागेत मान्यता देण्यात आलेली आहे, त्याच जागेत विद्यार्थी प्रवेश करण्यात यावेत. तसेच त्याच जागेचा मान्यतेबाबत विचार करण्यात येईल, जर जागेत बदल आढळल्यास मान्यता रद्द करण्यात येईल.

३) सदर संस्थेस अभ्यासक्रम चालविण्यासाठीची मान्यता ही संस्थेने जागेसंबंधी सादर केलेल्या दस्ताऐवजामधील एकूण क्षेत्रफळांचे आणि नकाशा मधील उपलब्ध जागेच्या आधारे देण्यात येत आहे.

४) सदर संस्थेस महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरु करण्यास स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता दिली असली तरीही, भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान अथवा आर्थिक मदत देण्यात येणार नाही. तसेच, या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, तसेच शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क चा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

५) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चित करण्यासाठी गठीत समितीच्या शिफारशीनुसार निर्धारित करण्यात आलेले प्रशिक्षण शुल्क उक्त संस्थांना लागू राहील.निर्धारित केलल्या प्रशिक्षण शुल्कापेक्षा अधिकच्या प्रशिक्षण शुल्काची आकारणी करता येणार नाही.

६) सदर अभ्यासक्रमांना स्वंयअर्थसहाय्यहित तत्वावर मान्यता देण्यात आल्यामुळे या अभ्यासक्रमासाठी संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कर्मचारी वर्गाची सेवा/वेतन व तद्अनुषंगीक बाबींची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील. याबाबत शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

७) सदर संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावातील अभिलेखानुसारच संस्थेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, त्यामध्ये भविष्यात काही विसंगती/ बेकायदेशीर आढळल्यास संबंधित संस्थेतेतील अभ्यासक्रमाची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल आणि अशा दोषी संस्थांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

८) "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता मिळालेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम" असा सूचना फलक संस्थांनी दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. सूचना फलकावर अभ्यासक्रमांच्या मंजूर तुकड्यांची संख्या व मंजूर प्रवेश क्षमता यांचा उल्लेख करण्यात यावा. संस्थेचे नाव मेडीकल/ इंजिनिअरींग/ पॉलीटेक्नीक/ आय.टी.आय. अथवा तत्सम नाव देण्यात येऊ नये आणि त्याऐवजी संस्थेच्या नावाच्या पुढे "कौशल्य विकास संस्था" असे नमूद करणे बंधनकारक आहे. संस्थानी अशा प्रकारे नावात बदल करून सादर न केल्यास अशा संस्थांचा मान्यतेसाठी विचार करण्यात येणार नाही. संस्थेने पायाभुत सुविधा व इतर बाबीची पुर्तता प्रस्ताव/ अर्ज सादर करतेवेळी त्यामध्ये संस्थेचे जुने नाव व सुधारीत नाव असे दोन्ही नावे नमूद करणे बंधनकारक राहील.

९) यापूर्वी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक: व्हीओसी-२०१२/५९१/ प्र.क्र.२४५(क)/व्यशि-४, दि, १६ जानेवारी, २०१३ अन्वये आवश्यक ती अनामत रक्कम रोखीने चलनाद्वारे अथवा बॅंक गॅंरटीच्या स्वरुपात भरण्याची तरतूद करण्यात आली होती. तथापि, मंडळाचे पत्र क्र. बैठक/का.क्र. १२/२०२३/३०३, दि. ३१.०३.२०२३ नुसार मान्यता देण्यात आल्याप्रमाणे अनामत रक्कम उक्त मंडळाच्या बचत बॅंक खात्यात ऑनलाईन पध्दतीने संबंधित मान्यता प्राप्त संस्थेने जमा करणे आवश्यक राहील.

१०) मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या अधिकच्या/नवीन तुकडयांची प्रवेशक्षमता प्रती तुकडी ३० इतकी राहील.

११) संस्थेने विद्यार्थी प्रवेश करणेची मान्यता मिळाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेश केल्यास, किंवा मंजुरी पेक्षा ज्यादा प्रवेश केल्यास असे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. याकरीता संस्थेस "महाराष्ट्र राज्यात कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे (प्रतिबंध) अधिनियम, २०१३" लागू राहील.

१२) मान्यताप्राप्त अभ्यासक्रम मान्यता दिलेल्या शैक्षणिक वर्षात संस्थेने सुरू न केल्यास अथवा सदर अभ्यासक्रमाच्या तुकडीत सतत ३ वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के पेक्षा कमी प्रवेश झाल्यास सदर संस्थेची मान्यता आपोआप रद्द होईल. तद्नंतर संस्थेस सदर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मान्यता प्रक्रिया नव्याने करणे आवश्यक राहील.

१३) महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात शासनाने राष्ट्रीय कौशल्य पात्रता आराखडा (NSQF) नुसार बदल केल्यास त्याप्रमाणे अभ्यासक्रम राबविणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१४) पॅरामेडीकल गटातील अभ्यासक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आलेल्या संस्थांनी आवश्यक त्या ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रातील संबंधित परिषद / मंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

१५) पॅरामेडीकलच्या पदविका (Diploma) व प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार हे आरोग्य सहाय्यक म्हणून काम करण्यास पात्र राहतील.

१६) पॅरामेडीकलच्या पदविका (Diploma) व प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रम हे वैद्यकीय अभ्यासक्रम नाहीत व उमेदवार कोणत्याही रुग्णास कोणतेही औषध लिहून देण्यास (Prescribe drugs) पात्र असणार नाही.

१७) पॅरामेडीकलच्या पदविका (Diploma) व प्रमाणपत्र (Certificate) स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमदवारांना "डॉक्टर (Doctor)" ही उपाधी (Title) लावण्यास मनाई राहील.

१८) मान्यता दिलेल्या संस्थांनी व्यवसाय अभ्यासक्रम सुरू केले आहेत तसेच अभ्यासक्रमनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी शासनास दोन महिन्यात सादर करावी.

१९) संबंधित संस्थेने आभासी वर्गाची (Virtual Classroom) निर्मिती करावी.

२०) मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेकडून कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्याचे सिध्द झाल्यास सदर संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल.

२. शासनाने सुधारणा केलेले शुल्क संबंधित संस्थेकडून आकारण्याची दक्षता संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांनी घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६११०४१६४००८२१०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAROSE MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.11.04 16:42:42 +05'30'

(मुं. उ. भरोसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.

४. संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुलुंड, मुंबई.
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/
छ. संभाजीनगर/ अमरावती/नागपूर (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत)
६. संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत).
७. संबंधित संस्था. (महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत)
८. निवडनस्ती (कौशल्य-२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.व्हिओसी-२०२६/प्र.क्र.१०२/(ई-१८६२०६६)/कौशल्य-२, ४ नोव्हेंबर, २०२६

सोबतचे "प्रपत्र-अ"

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता मंडळाचे व्यवसाय अभ्यासक्रम प्रथमच नवीन संस्थेत नव्याने सुरु करण्यासाठी/जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे /जुन्या संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या तुकडीत वाढ करणे करीता प्रपत्र-अ मधील शिफारस पात्र संस्थांची अभ्यासक्रम निहाय यादी.

अ. क्र.		संस्थेचे नाव (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढ करिता)	क्षेत्र	मान्यतेचा प्रकार	तुकडी संख्या
१	**वसंतराव नाईक कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, राजसारथी कॉलनी, ता.किनवट, जि.नांदेड, पिन कोड- ४३१८०४ (२०२६०२V६४००२३)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	४
	२	सी. सी. इन हेल्थ वर्कर (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ२०१२०३)	हेल्थ केअर	नवीन संस्था	१
२	**आई कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, वामनभाऊ नगर, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर, पिन कोड- ४१४१०२ (२०२६०४V६४०३०५)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
३	**येळेश्वर कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, मु.पो.येळी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर, पिन कोड- ४१४११३ (२०२६०३V६४०२४४)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
४	**ग्लोबल.कॉम कॉम्प्युटर एज्युकेशन कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, N४३/JD १-/१२२-३, सापत चहाच्या मागे, सिडको, तालुका व जिल्हा नाशिक, पिन कोड ४२२००९ (२०२६०६V६४०६१८)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
५	**माही शैक्षणिक संस्था कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, घानकर लेन, रविवार पेठ, तालुका व जिल्हा नाशिक, पिन कोड ४२२००१ (२०२६०२V६४००१५)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	२
६	**द लेव्हल अप कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, साखरपे हॉस्पिटल जवळ, श्री गजानन मंगल कार्यालयाच्या समोर, डंबल गल्ली, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर, पिन कोड ४१६११५ (२०२६०५V६४०४३४)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	४
७	**युनिक कॉम्प्युटर इंन्स्टिट्युट कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, जवाहर इमारत, दर्गा रोड, रुकडी ग्रामपंचायत जवळ, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, पिन कोड ४१६११८ (२०२६०५V६४०४२३)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	३
८	**वी टेक्नोलॉजी फाउंडेशन कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, ४०१, दुसरा मजला, साई गौरव, विंग ए, २०४०, जन मोहम्मद मार्ग, कॅम्प, तालुका व जिल्हा पुणे पिन कोड ४११००१ (२०२६०२V६४०००६)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन ॲडव्हान्स सायबर सिक्युरिटी ॲन्ड डिजिटल फॉरेन्सिक्स (पोलीस) (अर्धवेळ) कालावधी - तीनशे तास (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ११२००४)	आयटी-आयटीइएस	नवीन संस्था	१

अ. क्र.		संस्थेचे नाव (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढ करिता)	क्षेत्र	मान्यतेचा प्रकार	तुकडी संख्या
	३	सी. सी. इन कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफीस (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ१०११०१)	आयटी-आयटीइएस	नवीन संस्था	१
	४	सी. सी. इन ॲडव्हान्स कॉम्प्युटराइझड अकाऊंटींग युझींग टॅली (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ१०१११२)	बँकींग, फायनांशिअल सर्वीसेस ॲन्ड इन्शुरंस	नवीन संस्था	१
९	**आशीर्वाद कॉम्प्युटर कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, ८१, बुधवार पेठ, भूमी टॉवर्स, टाऊन हॉल जवळ कराड, ता.कराड, जि.सातारा, पिन कोड ४१५११० (२०२६०६V६४०६२१)**				
	१	सी. सी. इन कॉम्प्युटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
१०	**मातोश्री कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, कपिलमुनी मंदिर समोर, जुना चरथा रोड, अंकुश नगर, तालुका व जिल्हा बीड, पिन कोड ४३११२२ (२०२६०३V६४०१७७)**				
	१	सी. सी. इन कॉम्प्युटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
११	**नाथ कॉम्प्युटर कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, दत्त नगर, केएसके कॉलेज रोड, बीड, तालुका व जिल्हा बीड, पिन कोड ४३११२२ (२०२६०३V६४०२०७)**				
	१	सी. सी. इन कॉम्प्युटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
१२	**न्यू इन्फोटेक कॉम्प्युटर्स टायपिंग अँड कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, माऊली नगर, लोहिया मंगल कार्यालयाजवळ, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव पिन कोड ४१३६०१ (२०२६०६V६४०६७३)**				
	१	सी. सी. इन कॉम्प्युटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
१३	**शीतल कॉम्प्युटर्स अँड कॉम्प्युटर टायपिंग कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, संतकृपा निवास, नवी पेठ, पोस्ट खरवंडी कासार, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर, पिन कोड ४१४११३ (२०२६०६V६४०७१८)**				
	१	सी. सी. इन कॉम्प्युटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	तुकडीत वाढ	१
१४	**श्री नारायण गुरू कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, श्री नारायण नगर, पी.एल. लोखंडे मार्ग, चेंबूर, ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर, पिन कोड ४०००८९ (२०२६०३V६४०१२८)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
१५	**आदर्श कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, १०४, देवड, विचूंबे, नवीन पनवेल, मुंबई पुणे द्रुतगती महामार्गालगत, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड ४१०२०६ (२०२६०४V६४०३८८)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन हॅन्डक्राफ्ट ॲन्ड वर्क एक्सपेरिअन्स टिचर (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४०९२०३)	मिडीया, इंटरटेनमेंट ॲन्ड आर्ट	नवीन संस्था	१
१६	**एबीसीडी कौशल्य विकास संस्था, विभाग-नाशिक, गोवैश, प्लॉट क्रमांक २८ २९, जनता राजा कॉलनी, मखमलाबाद रोड, पंचवटी,तालुका व जिल्हा नाशिक, पिन कोड ४२२००३ (२०२६०६V६४०५४५)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१

अ. क्र.		संस्थेचे नाव (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढ करिता)	क्षेत्र	मान्यतेचा प्रकार	तुकडी संख्या
१७	**माऊंट कार्मेल कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, लुल्ला नगर, तालुका व जिल्हा पुणे, पिन कोड ४११०४० (२०२६०३V६४००९१)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
१८	**मेस्को एज्युकेशन सोसायटी प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग संस्था कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, रेडियंट इंग्लिश हायस्कूल, प्लॉट नं.४३, ४४, ४५, सेक्टर ९, मौलाना अबुल कलाम आझाद स्टेडियम समोर, कौसा मुंब्रा, तालुका व जिल्हा ठाणे ४००६१२ (२०२६०४V६४०३६९)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	तुकडीत वाढ	१
१९	**स्मार्ट माइंड अकॅडमी कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, दुकान क्रमांक ९, भक्ती निवास, सेक्टर-११, सानपाडा, नवी मुंबई तालुका व जिल्हा ठाणे पिन कोड ४००७०५ (२०२६०३V६४०१८६)**				
	१	सी. सी. इन प्रि स्कुल टिचर ट्रेनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४११२०६)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
२०	**आर.एम. किचन इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, बाबासाहेब संभाजी पाटील, गेट नं.२८२ गारगोटी रोड, कळंबे तर्फ ठाणे, कोल्हापूर, करवीर, कळंबे टी. ठाणे (CT), ता.करवीर, जि.कोल्हापूर, पिन कोड ४१६००७ (२०२६०२V६४००५०)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४१५४०१)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजी (पूर्णवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४०१२०८)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
	३	सी. सी. इन कलीनरी ऑपरेशनस् - ॲडव्हान्स (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३७१००८)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
	४	सी सी हॉटेल मॅनेजमेंट (पूर्णवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३७२००१)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
२१	**दिपेश पटणी एज्युकेशन अकॅडमी कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, कार्यालय क्रमांक ४०१, एस क्रमांक ६९७/६९८, भूखंड क्र. ४१७ ४१८, चंद्रविजय को.ऑप.हौ.सो., श्री स्वामी विवेकानंद मार्ग, रुणवाल बिल्डिंग, गुलटेकडी, तालुका व जिल्हा पुणे, पिन कोड ४११०३७ (२०२६०२V६४००७५)**				
	१	सी. सी. इन फाइनांशिअल लिटरसी (अर्धवेळ) कालावधी - साठ तास (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ०५१०२२)	बँकींग, फायनांशिअल सर्वीसेस ॲन्ड इन्शुरंस	नवीन संस्था	१
२२	**प्रसाद इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, ई-१२५, ऑफिस नं. १७-२०, राहुल अपार्टमेंट, सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड ४१०२१० (२०२६०५V६४०४१०)**				
	१	सी. सी. इन इव्हेंट मॅनेजमेंट (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४१५२०५)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन फायनान्शियल अकाउंटिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४०८२१५)	बँकींग, फायनांशिअल सर्वीसेस ॲन्ड इन्शुरंस	नवीन संस्था	१
२३	**एसजी फॅशन अँड कौशल्य विकास संस्था, विभाग-पुणे, एसयूएस गारमेंट आर्टिसन्स असोसिएशन, भुजबळ चौक, हिंजवडी वाहतूक पोलीस स्टेशन जवळ, वाकड, तालुका व जिल्हा पुणे, पिन कोड ४११०१७ (२०२६०४V६४०३९८)**				
	१	सी सी गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग अँड फॅशन डिझायनिंग (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४१०२०४)	अपॅरल मेड-युपीएस ॲन्ड होम फर्निशींग	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन कॉम्पुटराइझड फॅशन डिझायनिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४१०१०४)	अपॅरल मेड-युपीएस ॲन्ड होम फर्निशींग	नवीन संस्था	१
२४	**जी. डी. आंबेडकर प्रतिष्ठान व्यवसाय आणि कौशल्य विकास संस्था, विभाग-मुंबई, आरएमएमएस कॅम्पस, जी.डी. आंबेकर मार्ग, टाटा हॉस्पिटल, हाफकिन इन्स्टिट्यूटच्या मागे, परेल,तालुका व जिल्हा मुंबई शहर पिन कोड ४०००१२ (२०२६०५V६४०४१७)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन हॉटेल ऑपरेशन्स (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४०१४०२)	टुरीझम ॲन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१

अ. क्र.		संस्थेचे नाव (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढ करिता)	क्षेत्र	मान्यतेचा प्रकार	तुकडी संख्या
	२	सी. सी. इन हॉटेल मॅनेजमेंट आणि कॅटरिंग टेक्नॉलॉजी (पूर्णवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक -MSBQ४०१२०८)	टुरीझम अॅन्ड हॉस्पीटॅलीटी	नवीन संस्था	१
२५	**बाजीराव पाटील कौशल्य विकास संस्था, विभाग - छत्रपती संभाजीनगर, गट नंबर १९४ अंबेजोगाई रोड नायगाव, ता.कळंब, जि.धाराशिव, पिन कोड ४१३५२८, (२०२६०२V६४००२९)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०२४०९)	पॉवर	नवीन संस्था	१
	२	डिप्लोमा कोर्स इन अॅग्रीक्ल्चर इंजीनिअरींग (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०५४४०)	अॅग्रीकल्चर	नवीन संस्था	१
२६	**सावित्रीबाई फुले व्यवसाय प्रशिक्षण संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, संत नामदेव नगर, धानोरा रोड बीड, ता. व जि.बीड, पिन कोड ४३११२२ (२०२६०४V६४०३०६)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन सर्व्हेयर (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ०८४००१)	कन्स्ट्रक्शन	जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम	२
२७	**साई टेक्निकल कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, वडवणी- चिंचवण रोड, वडवणी ता. वडवणी, जि. बीड, पिन कोड- ४३११४४ (२०२६०४V६४०२६३)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन नॅचरोपॅथी अॅंड योगी सायन्स (पुर्ण वेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ२०१४१७)	हेल्थ केअर	नवीन संस्था	१
२८	**श्री गणेश कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड पिन कोड ४३११४४ (२०२६०७V६४०८६६)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप अॅन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन कोर्स शॉर्टहॅन्ड (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक (MSBQ४०८११०)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप अॅन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
२९	**कौशल्य विकास व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर, विभाग-छत्रपती संभाजीनगर, बाबरा, हिवरा रोड ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर, पिन कोड ४३११५१ (२०२६०३V६४०१४१)**				
	१	सी. सी. इन ट्रेसर्स (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ३०४२०१)	कन्स्ट्रक्शन	नवीन संस्था	२
	२	डिप्लोमा कोर्स इन सर्व्हेयर (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ०८४००१)	कन्स्ट्रक्शन	नवीन संस्था	१
३०	**प्रणीती कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, परंडा, तालुका- परंडा, जिल्हा- धाराशिव, पिन कोड ४१३५०२**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप अॅन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
३१	**शिवश्री कौशल्य विकास संस्था, विभाग-छत्रपती संभाजीनगर, नारायण नगर, औसा रोड, लातूर, तालुका व जिल्हा लातूर पिन कोड ४१३५१२ (२०२६०३V६४०२१५)**				
	१	सी. सी. इन हेल्थ वर्कर (अर्धवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ२०१२०३)	हेल्थ केअर	नवीन संस्था	१
	२	डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०२४०९)	पॉवर	नवीन संस्था	१
	३	सी. सी. इन कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (पुर्णवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ३०४२०२)	कन्स्ट्रक्शन	नवीन संस्था	१
३२	**दिशा कौशल्य विकास संस्था, विभाग- नाशिक, दिशा संस्था, २४३०/३, दौंड-जामखेड रोड, तालुका- श्रीगोंदा, जिल्हा-अहिल्यानगर, पिन कोड ४१३७२६ (२०२६०३V६४०१५४)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप अॅन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	४
३३	**लक्ष्मी कौशल्य विकास संस्था, विभाग- नाशिक, निखिल पार्क, गणेश नगर, बोकडदरे तालुका- निफाड, जिल्हा- नाशिक, पिन कोड ४२२३०३ (२०२६०४V६४०३९९)**				

अ. क्र.		संस्थेचे नाव (संस्था संकेतांक जुन्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम व तुकडी वाढ करिता)	क्षेत्र	मान्यतेचा प्रकार	तुकडी संख्या
	१	डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०२४०९)	पॉवर	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (पुर्णवेळ) कालावधी - एक वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ३०४२०२)	कन्स्ट्रक्शन	नवीन संस्था	१
३४	**मकासरे कौशल्य विकास संस्था, विभाग- नाशिक, बच्छाव हॉस्पिटल, उदय कॉलनीजवळ, मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक (एम कॉर्पोरेशन), तालुका व जिल्हा- नाशिक, पिन कोड ४२२००३ (२०२६०२V६४००१२)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०२४०९)	पॉवर	नवीन संस्था	२
३५	**योग इन्फोटेक कॉम्प्युटर्स कौशल्य विकास संस्था, विभाग- नाशिक, एन -४१, एफ-३/१/३, साईबाबा नगर, महाकाली रोड, सिडको, नाशिक, तालुका व जिल्हा- नाशिक पिन कोड ४२२००९ (२०२६०६V६४०६६१)**				
	१	सी. सी. इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ१०११०४)	आयटी-आयटीइएस	नवीन संस्था	२
	२	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	१
३६	**न्यु स्वामी विवेकानंद कौशल्य विकास संस्था, विभाग- पुणे, शाहूवाडी,तालुका- शाहूवाडी,जिल्हा- कोल्हापूर, पिन कोड ४१६२१५ (२०२६०३V६४०१७३)**				
	१	डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन (पूर्णवेळ) कालावधी - दोन वर्ष (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ३०२४०९)	पॉवर	नवीन संस्था	१
३७	**मिलेनियम कौशल्य विकास संस्था, विभाग- पुणे, परमाळे, तालुका व जिल्हा- सातारा,पिन कोड४१५००२ (२०२६०२V६४००६२)**				
	१	सी. सी. इन फ्रुट प्लॅन्ट नर्सरी (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ३०५१२०)	ॲग्रीकल्चर	नवीन संस्था	१
	२	सी. सी. इन फ्लॉवर प्लॅन्ट नर्सरी (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक MSBQ३०५१२१)	ॲग्रीकल्चर	नवीन संस्था	१
३८	**दर्पण कौशल्य विकास संस्था, विभाग- पुणे, डी.पी. भोसले कॉलेजजवळ, रहिमतपूर रोड, कोरेगाव, तालुका-कोरेगाव जिल्हा-सातारा, पिन कोड ४१५५०१ (२०२६०७V६४०७२६)**				
	१	सी. सी. इन कॉम्पुटर टायपिंग (अर्धवेळ) कालावधी - सहा महिने (अभ्यासक्रम संकेतांक - MSBQ४०८१००)	मॅनेजमेंट, इंटरप्रुनअरशीप ॲन्ड प्रोफेशनल	नवीन संस्था	३